माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज

द्वितीय अपिल क्र.रामाआ :- ४२९६ / २०२२ / कोल्हापूर

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| खलील महमद शेख | कर निर्धारण व संग्राहक, घरफाळा विभाग, कोल्हापूर महानगरपालिका | घरफाळा विभाग, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर महानगरपालिका |

( सुनावणी दिनांक - १८ /०२ /२०२५ )

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि. १०.०८.२०२२ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. व्दितीय अपील दाखल करतांना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसुची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. त्यानूसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी तर्फे अॅड पाटील समक्ष हजर आहेत तर विद्यमान जन माहिती अधिकारी ऑनलाईन हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात, अपीलार्थी यांनी दि.२८ .०३.२०२२ च्या माहिती अर्जात असेसमेंटचे उतारे, असेसमेंट नोंदवहीच्या झेरॉक्स व असेसमेंट उतारे जतन करणेचा कालावधी व नष्ट करणेच्या कार्यवाही बाबतचा शासन निर्णय व संबंधीत माहिती मागितलेली आहे.

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी तर्फे अॅड.पाटील यांनी अवगत केले की अपिल आदेश होऊनही माहिती दिली नाही, आढळ होत नसल्याचे कळविले.

आज रोजी सुनावणी दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी ऑनलाईन हजर राहून अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरवियास तयार आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी दरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपीलावर सुनावणी १० दिवसात माहिती पुरविण्याचे आदेश पारीत केले आहेत.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कर निर्धारण व संग्राहक, घरफाळा विभाग, कोल्हापूर महानगरपालिका यांनी अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र "अ" मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहीत तरतूदीनूसार देय होणारी असेसमेंटचे उतारे आयोगाचे आदेश प्राप्त होताच ३० दिवसांचे आत अपिलार्थीस विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. सदर आदेशाची अंमलबजावणी संबधित अधिकारी यांनी विहिती कालावधीत करावी अन्यथा त्यांच्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

२. प्रथम अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी सुनिश्चित करावी.

३. उपरोक्त निर्देशांसह द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

**( मकरंद रानडे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ पुणे.**

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र
सत्यमेव जयते
पुणे खंडपीठ

जावक क्र. ४२९६ / २०२२ / कोल्हापूर / 7322 / 2025 दिनांक - 6/3/2025